पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.

मा. क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक – १७

**सभावृत्तांत**

दिनांक - १६/०१/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १६/०१/२०१३ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. बोकड रामदास गेणभाऊ
५) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.माछरे - विशेष अधिकारी, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी, मा.भंडलकर - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**----------**

विषय क्र.२) सार्वजनिक संस्था/मंडळे यांना सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास दिलेल्या मनपा व्यायामशाळांचा करारा संपुष्टात येत असल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) खेळाडू दत्तक योजने अंतर्गत पात्र खेळाडूंना योजनेचा लाभ देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) मंतिमंद व अपंग दिनानिमित्त मनपा परिसरातील मतिमंद व अपंग विद्यार्थ्यांच्या विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महापौर चषक जिल्हास्तर जलतरण स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) महापौर चषक राज्यस्तर शुटींगबॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपळे निलख येथील प्रभाग क्र.५४ मधील भांडे इमारतीमधील व्यायामशाळा सेवा शुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) महापौर केसरी जिल्हास्तर कुस्ती स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.संपत पवार, मा.रामदास बोकड,यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) मोरया ग्राऊंड इमारतीमधील गाळयांमध्ये योगा, बालसंस्कार केंद्र, मेडिटेशन केंद्र, अपंग केंद्र चालू करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) क्रिडा शिक्षकांना त्यांच्या पूर्वीच्या शाळेत रुजू करणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.संपत पवार यांचा प्रस्ताव.

---------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - १

दिनांक - १६/०१/२०१३ विभाग - क्रीडा विभाग

सुचक : मा. रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/७३५/२०१३, दि.०२/०१/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुना डिस्ट्रिक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस् असो. यांना आंतर कचेरी कॅरम ( महिला / पुरुष ), फुटबॉल, हॉकी, लॉनटेनिस, बुध्दीबळ या ६ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रिक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस् असोशिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,०८,९००/- ( अक्षरी र.रु. एक लाख आठ हजार नऊशे फक्त ) अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधीतील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेस मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - २

दिनांक - १६/०१/२०१३ विभाग - क्रीडा विभाग

सुचक : मा. शांताराम भालेकर अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/१६/२०१३, दि.०८/०१/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सार्वजनिक संस्था / मंडळे यांना सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास दिलेल्या प्रस्तावात नमुद एकूण ३२ मनपा व्यायाम शाळांचा करार संपुष्टात येत असल्याने त्यांना माहे मार्च २०१३ अखेर सेवाशुल्क देऊन चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ३

दिनांक - १६/०१/२०१३ विभाग - क्रीडा विभाग

सुचक : मा. शांताराम भालेकर अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/७/कावि/५०/२०१३, दि.१६/०१/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

खेळाडू दत्तक योजनेअंतर्गत १० खेळ प्रकारात १०० खेळाडूंना प्रत्यक्ष लाभ देणेस मान्यता देणेकामी तसेच याकामी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजे र.रु. २०,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता देणेकामी व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद र.रु.२०,००,०००/- या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ४

दिनांक - १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व साई संस्कार संस्था, चिंचवड, पुणे १९ यांचे सहकार्याने माहे जानेवारी २०१३ याकाळात श्री साई स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुलेनगर, चिंचवड येथे अपंग तसेच मानसिक अपंग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३,०८,०००/- चे खर्चास मान्यता देणेकामी तसेच सदर स्पर्धा अनुषंगाने विद्युत, स्पिकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च हा विद्युत अ प्रभाग व स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च हा स्थापत्य अ प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.२,३४,०००/- हा क्रीडा स्पर्धा निधी वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ५

दिनांक - १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा फुटबॉल असो. व वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोशिएशन यांचे मान्यतेने स्व.राजेश बहल स्पोर्टस् अन्ड सोशल फाऊंडेशन, संत तुकारामनगर, पिंपरी १८ यांचे सहकार्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, संत तुकारामनगर, पिंपरी १८ येथे माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल

स्पर्धा २०१३ आयोजित करणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१६,५१,५००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी तसेच सदर खर्चातील स्थापत्य व विद्युत विषयक खर्च र.रु.९,८८,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य व विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु. ६,६३,५००/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - ६

दिनांक - १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा जलतरण असो. यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड स्विमिंग असोशिएशन यांचे सहकार्याने मोहननगर जलतरण तलाव, चिंचवड अथवा कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम जलतरण तलाव, नेहरुनगर, पिंपरी १८ येथे माहे मार्च २०१३ मध्ये आयोजित करणेकामी येणा-या अंदाजे र.रु.२,६२,१००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी तसेच सदर खर्चातील स्थापत्य व विद्युत विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य व विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु. २,१२,१००/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - ७

दिनांक - १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, महाराष्ट्र राज्य शुटींग बॉल असो. व पुणे जिल्हा शुटींग बॉल असो. यांचे मान्यतेने स्वामी विवेकानंद मैदान महात्मा फुलेनगर - कृष्णानगर चिंचवड, पुणे १९ येथे माहे फेब्रुवारी २०१३ मध्ये महापौर चषक राज्यस्तर शुटींग बॉल स्पर्धा २०१३ आयोजित करणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१२,१२,०००/- अथवा प्रत्यक्ष

येणा-या खर्चास मान्यता देणेकामी तसेच सदर खर्चातील स्थापत्य व विद्युत विषयक खर्च र.रु.३,१५,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य व विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु. ८,९७,०००/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४१ विषय क्रमांक : ८

दिनांक : १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

पिंपळे निलख येथील प्रभाग क्र. ५४ मधील भांडे इमारतीमधील व्यायामशाळा श्री समर्थ ट्रस्ट, रहाटणी या संस्थेस दरमहा र.रु.१,९००/- अथवा योग्य त्या अंशत: सेवा शुल्क तत्वावर ५ वर्षे (पाच वर्षे) कालावधीकरीता देखभाल, संरक्षण व चालन कामी देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४२ विषय क्रमांक : ९

दिनांक : १६/०१/२०१३

सुचक : मा.संपत पवार अनुमोदक : मा.रामदास बोकड

संदर्भ : मा. संपत पवार, मा. रामदास बोकड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने थेरगांव येथे दिनांक १६/०२/२०१३ ते १७/०२/२०१३ रोजी महापौर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४३ विषय क्रमांक : १०

दिनांक : १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

मोरया ग्राऊंड इमारतीमधील जे छोटे छोटे गाळे आहेत त्या गाळयांमध्ये योगा, बालसंस्कार केंद्र, मेडिटेशन केंद्र, अपंग केंद्र चालू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ४४ विषय क्रमांक : ११

दिनांक : १६/०१/२०१३

सुचक : मा.रामदास बोकड अनुमोदक : मा.संपत पवार

संदर्भ : मा. रामदास बोकड, मा. संपत पवार यांचा प्रस्ताव -

क्रीडा शिक्षकांचे निवडणूक कामकाज संपल्यानंतर आणि ते क्रीडा विभागात रुजू झाल्यानंतर त्यांना त्यांच्या पूर्वीच्या शाळेवर कामकाज देऊन शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडाचे मार्गदर्शनासाठी क्रीडा शिक्षकांना शाळेवर रुजू करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( थोरात वनिता एकनाथ)**
**सभापती**
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ४० /२०१३
दिनांक : १७/०१/२०१३

प्र.नगरसचिव
पिंप्री चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.